# ये ना गं भेटायला......

नको नकोस झाल आहे आता सगळं |
स्वप्नातल्या जगपेक्षा खर जग आहे खूपच वेगळ ||
यापूर्वी कधी घराबाहेर पडली नव्हती |
म्हणून कधी कधी खूप वाटते गं भीती ||
मान्य आहे घाबरून कस चालणार |
माझा मार्ग मलाच शोधावा लागणार ||
कुणालाच वेळ नसतो गं दुसऱ्यासाठी थांबायला |
म्हणून म्हणते आहे ये ना एकदा भेटायला ||

मम्मी मम्मी करण्यात दिवस कसा संपायचा |
इकडे सूर्य उगवला की तिकडे लगेच मावळायचा ||
दिवसाची सुरुवात तू उठवायला आली की तुझ्या चेहरा पाहून व्हायची |
आणि एवढी मोठी रात्र पण तुझ्या कुशीत लगेच संपायची ||
आता एक सुट्टी आली तरी जग थांबल्यासारख होत |
आणि अचानक तुला भेटावस वाटत ||
कुणीच येत नाही गं के झालं म्हणून विचारायला |
म्हणून म्हणते आहे ये ना एकदा भेटायला ||

खूप आला गं कंटाळा मेस च खाऊन |
ये ना एकदा घरचा डबा घेऊन ||
चटणी पोळी असली तरी आनंदाने खाणार |
आवडीची भाजी का नाही केली म्हणून नाही गं रूसणार ||
घरी मनात आलं की लगेच डिश रेडी असायची |
आणि थोड जरी मीठ कमी झालं तरी लगेच मी रूसयाची ||
आता नाही गं येत कुणी जेवलीस का म्हणून विचरायला |
म्हणून म्हणते आहे ये ना एकदा भेटायला ||

रोज काही ना काही तरी विचित्र एकायला मिळतंय |
खरं जग के असतं ते आता बाहेर पडल्यावर कळतय ||
अंगाला शहारे येतात गं या बातम्या एकून |
आणि खरचं वाटत घर किती सुरक्षित होत, आजची परिस्थिति पाहून ||
का नाही गं जग तुझ्यासारख, सर्व काही समजून घेणार |
मनातल्या गोष्टी लगेच चेहऱ्यावरून ओळखणार ||
भीती वाटते गं दुसऱ्याशी मनमोकळेपणाने बोलायला |
म्हणून म्हणते आहे ये ना एकदा भेटायला ||

अंत फूल स्वतंत्र आहे वाटेल तिथे फिरायला |
पण नाही गं इच्छा होत without तुझ्या permission जायला ||
पप्पांसोबत फिरायला गेल की कसलच tension नसायच |
जे घ्यावस वाटल ते लगेच मिळायच ||
Financial Minister पेक्षाही superfast पप्पांची महिन्याची adjustment असते |
आता बाहेर पडल्यावर कळाल, जी फक्त आणि फक्त त्यानांच जमते ||
खूप वेळ लगेल गं मला इथे adjust व्हायला |
म्हणून म्हणते आहे ये ना एकदा भेटायला ||

मी माझे शंभर टक्के देण्याचा प्रयत्न करीन |
आज नाही तर उद्या कधीतरी adjust होईन ||
इकडे आल्यावर खूप काही नवीन शिकायला मिळालय |
स्व:तच्या पायावर उभ राहण्यासाठी पहिल पाऊल अंत मी टाकलंय ||
मान्य आहे आता आधीसारखं कायमच घरी नाही येता येणार |
पण तुमची आठवण मात्र नेहमीच खुणावत राहणार ||
अजून खूप वेळ आहे गं मला सासरी जायला |
म्हणून म्हणते आहे ये ना एकदा भेटायला ||

- कु. हर्षदा प्रकाश बोरसे.